उप विभागीय अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या दिनांक १.४.१९८९ ते दिनांक ३१.१२.२०१० या कालावधीच्या अंतिम ज्येष्ठता यादीत सुधारणा......

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्रमांक : उअज्ये २०१४/(प्र.क्र.११७/२०१४)/आ(वर्ग-२)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १० मार्च, २०१५

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१.१०.२०११.
२) शासन परिपत्रक क्रमांक : उअज्ये-२०१४/(प्र.क्र.११७/१४)/आ(वर्ग-२), दिनांक ३१.७.२०१४.
३) शासन निर्णय क्रमांक : जाप्रप-२०१४/(२८२/१४)/आ (वर्ग-२),दिनांक २३.२.२०१५.
४) शासन निर्णय क्रमांक : जाप्रप-२०१५/(१/१५)/आ (वर्ग-२), दिनांक २३.२.२०१५.

-: प रि प त्र क :-

शासन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांची ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे याबाबत सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन क्रमांक (१) समोरील दिनांक २१.१०.२०११ च्या शासन निर्णयान्वये सर्वकष धोरण आखून दिलेले आहे. त्यानुसार संदर्भाधीन क्रमांक (२) समोरील दिनांक ३१.७.२०१४ च्या परिपत्रकान्वये उप विभागीय अभियंता (स्थापत्य) या संवर्गाची दिनांक १.४.१९८९ ते दिनांक ३१.१२.२०१० या कालावधीची अंतिम ज्येष्ठता यादी, या संवर्गाच्या निवडसूच्यांना मिळणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२. आता श्री. संजय महादेव निवल, उपविभागीय अभियंता यांनी "कोष्टी" या जातीचे विशेष मागास प्रवर्गाचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्यामुळे संदर्भाधीन क्रमांक (३) येथील शासन निर्णयान्वये त्यांचा ज्येष्ठता दिनांक १५.६.१९९५ असा निश्चित करण्यात आलेला आहे. तसेच श्री. विनोद भय्यालाल मानकर, उपविभागीय अभियंता यांनी "गोवारी" या जातीचे विशेष

मागास प्रवर्गाचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्यामुळे संदर्भाधीन क्रमांक (४) येथील शासन निर्णयान्वये त्यांचा ज्येष्ठता दिनांक १५.६.१९९५ असा निश्चित करण्यात आलेला आहे. यास्तव दिनांक ३१.७.२०१४ अन्वये प्रसिध्द केलेल्या अंतिम ज्येष्ठता यादीमध्ये श्री. निवल यांची ज्येष्ठता अनुक्रमांक १८४-अ येथे व श्री. मानकर यांची ज्येष्ठता अनुक्रमांक १८४-ब येथे निश्चित करण्यात येत आहे.

३. हे शासन परिपत्रक जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अजयसिंग पाटील )
शासनाचे कार्यासन अधिकारी

प्रति,

१) प्रधान सचिव (ज.सं.प्र व नि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) प्रधान सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने)
४) जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व महासंचालक व कार्यकारी संचालक,
५) जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंता
६) सर्व सह /उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व अधीक्षक अभियंता
८) सर्व मुख्य अभियंते व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) अधीक्षक अभियंता व संचालक पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे,
१०) संबंधित अभियंता (संबंधित कार्यालयामार्फत)
११) आ(वर्ग-१), आ(संनि) कार्यासने, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
१२) आ (वर्ग-२) संग्रहार्थ.